(26)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद शहर **P.S.(ठाणे):** एम.आई.डी.सी. वाळूंज

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0033 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/01/2023 23:32

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 12/01/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 12/01/2023
   **Time From (वेळेपासून):** 14:30 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 14:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 12/01/2023 **Time (वेळ):** 23:20 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 043
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/01/2023 23:20 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 6 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** साजापुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

(27)



**6. Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

**(a) Name** (नाव): रोकडोबा दत्तुराव पदमपल्ले

**(b) Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

**(c) Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1978

**(d) Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

**(e) UID No.** (यु.आय.डी. क्र.):

**(f) Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | न्यु हनुमान नगर साजापुर ,एम.आई.डी.सी. वाळूंज,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | न्यु हनुमान नगर साजापुर ,एम.आई.डी.सी. वाळूंज,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र, भारत |

**(i) Occupation** (व्यवसाय):

**(j) Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रामकष्ण बारकु निकम | | | 1. जालाननगर औरंगाबाद,एम.आई डी.सी. वाळूंज,औरंगाबाद शहर, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

(28)



10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 12/01/2023

मी खालील सही करणार रोकडोबा दत्तुराव पदमपल्ले वय- 45 वर्षे, व्यवसाय- लेबर सप्लायर रा. घर नं 43/2/ न्यु हनुमान नगर साजापुर ता.जि.औरंगाबाद मो.क्र. 8275237953.
समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी दिनांक 11/01/2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, औरंगाबाद येथे हजर येवुन पोलीस निरीक्षक श्रीमती रेशमा सौदागर यांचे कक्षात दोन पंचा समक्ष लेखी तक्रार दिली होती ती पुढील प्रमाणे,
मी रोकडोबा दत्तुराव पदमपल्ले वय- 45 वर्षे, व्यवसाय- लेबर सप्लायर रा. घर नं 43/2/ न्यु हनुमान नगर साजापुर ता.जि.औरंगाबाद मो.क्र. 8275237953.
आज दिनांक 11/01/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, औरंगाबाद येथे समक्ष हजर येवुन तक्रार देतो की, मी वरील ठिकाणी माझ्या कुटूंबासह राहत असुन लेबर क्रॉन्ट्रॅक्टर म्हणुन साजापुर व एमआयडीसी वाळुज भागात लेबर पुरविण्यांचे कामकाज करतो त्यावर माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह होतो.
मौजे साजापुर ग्रामपंचायत अंतर्गत गट क्रमांक 43/2 मध्ये माझे मालकीचे राहते आरसीसी घर आहे. सदर राहते घराचे वरचा मजल्याचे बांधकाम करावयाचे असल्याने मी गट नंबर 43/2 मधील राहते घराची नोंद ग्रामपंचायत कार्यालयात करुन नमुना नंबर 8 अ चा उतारा घेणेसाठी साजापुर ग्रामपंचायत कार्यालयात दिनांक 11/01/2023 रोजी सकाळी 10.00 गेलो असता मला तेथे ग्रामविकास अधिकारी निकम साहेब हे भेटले मी त्यांना माझे गट नंबर 43/2 मधील राहते घराची नोंद ग्रामपंचायत कार्यालयात करुन नमुना नंबर 8 अ चा उतारा देण्याची मागणी केली. त्यावर ग्रामविकास अधिकारी श्री. निकम साहेब मला म्हणाले की, तुम्हाला तुमच्या घराची घरपटटी नियमीत करुन घेण्यासाठी 4000/- रुपये घरपटटी भरावी लागेल त्याची पावती मिळेल व नमुना नंबर 8 अ उतारा देण्यासाठी म्हणुन मला 5000/- रुपये दयावे लागेल असे म्हणुन 5000/-रुपयाची मागणी केली मी त्यांना घरपटटी भरुन घेवुन काम करण्याची विनंती केली परंतु ग्रामविकास अधिकारी निकम साहेब यांनी 5000/-रुपये दिल्याशिवाय माझे काम करणार नसल्याचे मला सांगितले. मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी श्री. निकम साहेब, ग्रामविकास अधिकारी यांना नाईलाजाने हो म्हणालो आहे. माझा व श्री. निकम साहेब यांचा देण्या घेण्याचा किंवा उसणवारीचा काहीएक व्यवहार नाही. तसेच माझी त्यांचे सोबत काही वैर अगर दुष्मनी नाही.
तरी मी आज दिनांक 11/01/2023 श्री.निकम साहेब, ग्रामविकास अधिकारी यांना ग्रामपंचायत कार्यालय साजापुर येथे भेटावयास जाणार आहे. त्यावेळी श्री. निकम, ग्रामविकास अधिकारी यांनी माझे गट नंबर 43/2 मधील राहते घराची नोंद ग्रामपंचायत कार्यालयात करुन नमुना नंबर 8 अ चा उतारा देणेसाठी म्हणुन माझ्याकडे 5000/- रुपये लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्वत: किंवा ईतरा मार्फत स्विकारल्यास त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी ही विनंती आहे.
माझ्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक श्रीमती रेशमा सौदागर यांनी बोलविलेले शासकिय पंच क्र. 1 हर्षल आनंद पारचा, पद-सफाईगार, कार्यालय-शासकिय अभियांत्रीकी महाविदयालय, औरंगाबाद व पंच क्र. 2 भाऊसाहेब बाबुराव जाधव, पद-कनिष्ट लिपीक, कार्यालय महानगर पालीका ड्रेनेज विभाग,मुख्यालय म.न.पा.औरंगाबाद असा आमचा ओळख परिचय करुन दिला मि दिलेल्या तक्रारीवर मी दोन्ही पंचानी व पो.नि.श्रीमती रेशमा सौदागर यांनी स्वाक्षरी केल्या. माझ्या तक्रारीचे अनुषंगाने पो.नि.श्रीमती रेशमा सौदागर यांनी पंच व सर्वानुमते दिनांक 11/01/2023 रोजी ग्रामपंचायत सजापुर ता.जि.औरंगाबाद येथे नेमणुकीस असलेले ग्रामविकास अधिकारी श्री. निकम साहेब यांची ग्रामपंचायत कार्यालय साजापुर, येथे जावुन लाच मागणीची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर मी माझे सोबत पो.नि. श्रीमती रेशमा सौदागर, सापळा पथक व शासकिय पंच असे सापळा कारवाईकामी लागणारे साहित्यासह खाजगी वाहनाने रवाना होवुन ग्रामपंचायत कार्यालय साजापुरचे अलीकडे सुरक्षीत ठिकाणी

थांबलो. सुरक्षीत ठिकाणाहुन माझ्याकडे व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन पंच क्र. 1 हर्षल आनंद पारचा, पद-सफाईगार, कार्यालय-शासकिय अभियांत्रीकी महाविदयालय, औरंगाबाद यांना सोबत घेवुन रवाना केले. ग्रामपंचायत कार्यालय सजापुर येथे गेल्यानंतर आम्ही श्री.निकम ग्रामविकास अधिकारी यांना समक्ष भेटलो असता श्री.निकम साहेब यांनी माझ्याकडे पाहुन पंचसाक्षीदाराचे समक्ष माझे गट नंबर 43/2 मधील राहते घराची नोंद ग्रामपंचायत कार्यालयात करुन घराची घरपटटी नियमीत करुन घेण्यासाठी 4000/- रुपये घरपटटी पावतीचे व नमुना नंबर 8 अ उतारा देण्यासाठी म्हणुन स्वत:साठी 5000/- रुपयेची मागणी करुन ते स्विकारण्याचे मान्य केले आहे. सदर लाचेची रक्कम दिनांक 12/01/2023 रोजी ग्रामपंचायत कार्यालय साजापुर येथे देण्याचे ठरले.
त्यानंतर मी पंचासह सुरक्षीत ठिकाणी परत आलो व सापळा अधिकारी पो.नि.श्रीमती सौदागर यांना पंचानी व मी सर्व हकिगत सांगितली त्यावरुन सर्वानुमते दिनांक 12/01/2023 रोजी ग्रामपंचायत कार्यालय सजापुर ता.जि. औरंगाबाद येथे लाचेचा सापळा आयोजीत करण्यात आला. सापळा कारवाईच्या वेळी ग्रामविकास अधिकारी श्री. निकम यांना देण्यासाठी घरपटटी पावतीचे 4000/-रुपये व लाच म्हणुन देण्या करिता 5000/-रुपये असे एकुण 9,000/- रुपये रक्कम ज्यात 500/-रुपये दराच्या 18 नोटा मी श्रीमती रेशमा सौदागर यांचे समक्ष हजर केल्या त्यांनी सदर 9000/-रुपये पैकी घरपटटी पावतीचे 4000/- रुपये (8 नोटा) माझ्या शर्टच्या समोरील डाव्याबाजुच्या खिश्यामध्ये ठेवल्या व लाचरक्कम म्हणुन देण्यात येणाऱ्या 5000/-रुपयेच्या 10 नोटांना ऍन्थ्रोसिन पावडर लावुन माझ्या पॅन्टच्या समोरिल उजव्या बाजूच्या खिश्यात ठेवण्यात आल्या. माझ्याकडे व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन देवुन मला व पंच क्र. 1 हर्षल आनंद पारचा, पद-सफाईगार असे अम्हाला ग्रामविकास अधिकारी श्री.निकम, यांचे भेटीकरिता सुरक्षीत ठिकाणावरुन ग्रामपंचायत कार्यालय साजापुर ता.जि.औरंगाबाद येथे रवाना केले. त्यानंतर मी पंच क्र. 1 हर्षल आनंद पारचा, असे सोबत जाऊन ग्रामपंचायत कार्यालय साजापुर मध्ये श्री. निकम, ग्रामविकास अधिकारी, यांना भेटलो व म्हणालो की, हे घ्या घरपटटी चे 4000/-रुपये असे म्हणुन माझ्या डाव्या हाताने शर्टाच्या समोरील खिशातुन 4000/-रुपये काढुन श्री.निकम यांना दिले. त्यांनी ते स्विकारुन त्यांचे समोरील टेबलच्या ड्रावर मध्ये ठेवुन दिले. त्यानंतर मी त्यांना तुम्ही नमुणा नं. 8 अ उतारा देण्यासाठी मागितलेले 5000/-रुपये तुम्ही मोजुन घ्या, असे म्हणुन माझ्या पॅन्टच्या समोरिल उजव्या बाजूच्या खिश्यातुन उजव्या हाताने रक्कम 5,000/-रुपये काढून निकम साहेब, यांचे समोर धरली असता त्यांनी ती रक्कम ठिक आहे असे म्हणुन त्यांच्या उजव्या हाताने स्वत: स्विकारुन उजव्या हातामध्येच ठेवली.
लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर लगेचच दुपारी दोन वाजुन तिस मिनटाचे सुमारास मी सापळा पथकास दिसेल अश्या रितीने पुर्वनियोजीत ईशारा केला असता, सापळा पथकातिल अधिकारी, कर्मचारी व पंच असे घटनास्थळी हजर आले. व पोलीस निरीक्षक श्रीमती रेशमा सौदागर यांनी लोकसेवक श्री.निकम, ग्रामविकास अधिकारी यांना लाचेच्या रकमेसह ताब्यात घेतले त्यांना आपला व सापळा पथकाचा परिचय देवुन त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव रामकृष्ण बारकु निकम वय 53 वर्षे, व्यवसाय नौकरी, पद-ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय साजापुर ता.जि. औरंगाबाद, रा. प्लॅट नं. 1, फर्स्ट ऐव्हिन्यु सोसायटी, जालननगर, औरंगाबाद असे सांगितले. त्यानंतर श्रीमती रेशमा सौदागर सापळा पथक दोन्ही पंच मी व श्री.निकम, ग्रामविकास अधिकारी असे तेथुन निघून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद येथे आलो. सदर घटने बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला.
दिनांक 12/01/2023 रोजी 14.30 वाजेच्या सुमारास ग्रामपंचायत कार्यालय साजापुर ता.जि.औरंगाबाद येथे रामकृष्ण बारकु निकम वय 53 वर्षे, व्यवसाय नौकरी, पद-ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय साजापुर ता.जि. औरंगाबाद, यांनी माझे गट नंबर 43/2 मधील राहते घराची नोंद ग्रामपंचायत कार्यालयात करुन नमुना नंबर 8 अ चा उतारा देणे◌ेसाठी म्हणुन माझ्याकड स्वत:साठी 5000/- रुपये लाचेची मागणी करुन 5000/-रुपये लाच रक्कम पंचसाक्षीदार समक्ष माझ्याकडून स्वत: श्री.निकम, ग्रामविकास अधिकारी, यांनी स्विकारली आहे. तरी रामकृष्ण बारकु निकम वय 53 वर्षे, व्यवसाय नौकरी, पद-ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय साजापुर ता.जि. औरंगाबाद यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे.
माझी वरिल फिर्याद माझे सांगणे प्रमाणे माझे समक्ष मराठीत संगणकावर टंकलिखीत करण्यात आली असुन मी वाचुन पाहिली माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष हि फिर्याद दिली सही

(30)



13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
RAJENDARA MOTIRAM BANGAR
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): psi
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)
**Name** (नाव): SANDEEP PANDURAI
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI

आर. एम. ...
पोलीस उप निरीक्षक
पो. स्टे. ... वाळुज
औरंगाबाद (श)